**मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले**
**अग्रणी महाविद्यालय कार्यक्रम (२०१८-१९)**
**एकदिवसीय कार्यशाळेचा अहवाल**

| **शीर्षक** | **लिंगभाव समानता** या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा | |
|---|---|---|
| **समिती** | **अध्यक्षा** | **तज्ज्ञ मार्गदर्शक** |
| अग्रणी महाविद्यालय | मा. प्राचार्या डॉ. योजना जुगळे | मा. उज्वला परांजपे |

**वार व दिनांक:** शुक्रवार, दि. १० ऑगस्ट २०१८, **वेळ:** सकाळी ९ ते दुपारी २
**स्थळ:** सेमिनार हॉल

**सहभाग:** नऊ महाविद्यालयांचे प्रतिनिधी, तज्ज्ञ मार्गदर्शकः ०१, प्राध्यापकः १०, विद्यार्थीः ४८, समिती सदस्यः ०५, शिक्षकेतर कर्मचारी, शिपाई आणि विद्यार्थी स्वयंसेवकः ०८; एकूणः **७२**

**उद्देश:** १. लिंग आणि लिंगभाव या दोन संकल्पना आणि त्यातील फरक स्पष्ट करणे; २. लिंगभाव हा सामाजिकदृष्ट्या कसा निर्माण होतो हे समजाऊन सांगणे; ३. वेगवेगळ्या माध्यमातून लिंगभावाचे आकलन करुन देणे; ४. सहभागी विद्यार्थ्यांकडून, त्यांचे व्यक्तीगत अनुभव समजाऊन घेणे व त्यांना समुपदेशन करणे

**संक्षिप्त अहवाल**

संत ज्ञानेश्वरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन, तसेच दीपप्रज्वलन करुन मान्यवरांनी कार्यक्रमाचे **उद्घाटन** केले. त्यानंतर, कार्यक्रम समन्वयक डॉ. निरंजन कुलकर्णी यांनी **कार्यशाळेची संकल्पना आणि उद्देश स्पष्ट** केले. तसेच, तज्ज्ञ **मार्गदर्शिकेची ओळख** उपस्थितांना करुन दिली. पुढे प्राचार्यांच्या हस्ते ग्रंथभेट देऊन, त्यांचा **सत्कार** करण्यात आला.

कार्यशाळेच्या **पहिल्या सत्रामध्ये** तज्ज्ञ मार्गदर्शक मा. उज्वला परांजपे यांनी लिंग आणि लिंगभाव ही संकल्पना समजाऊन सांगीतले. यातून, लिंग ही एक जैविक बाब असून, लिंगभाव हा समाजाने तयार केलेली कृत्रिम संकल्पना आहे हे स्पष्ट झाले. **पुढील सत्रामध्ये,** त्यांनी विविध माध्यमातून हा लिंगभाव अधिक स्पष्टपणे करुन सांगीतला. या माध्यमांमध्ये एकमेकांनी, दुसऱ्या व्यक्तीची ओळख करुन देणे; चौकटीबाहेर विचार करायला शिकवणे इ.चा समावेश होतो. तर **तिसऱ्या सत्रामध्ये,** एक प्रश्नावली उपस्थितांना देण्यात आली. त्यातील उत्तरांच्या आधारे, तज्ज्ञ मार्गदर्शिकेने, आपण कसे सामाजिक बंधनाच्या चौकटीत अडकलेले आहोत हे स्पष्ट केले. आणि त्यानंतर, त्यांनी समुपदेशन केले.

अशा प्रकारे, या तिन्ही सत्रातील मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिकांनंतर, तज्ज्ञांनी **विद्यार्थिनींशी चर्चा** केली. यावेळी विद्यार्थीनींनी विविध प्रश्न विचारले. त्यांचे यथायोग्य समाधान तज्ज्ञांनी केले. त्यानंतर, काही विद्यार्थीनींनी तसेच प्राध्यापकांनी एकंदर कार्यशाळेबाबत आपले **मनोगत व्यक्त** केले.

शेवटी **अध्यक्षीय समारोपामध्ये** मा. डॉ. जुगळे यांनी लिंगभाव कसा विकसित होतो हे विविध अनुभवांद्वारे समजाऊन सांगीतले. शेवटी डॉ. निरंजन कुलकर्णी यांनी **आभार** मानून कार्यक्रमाची सांगता केली.

त्यानंतर, **भोजनाचा** कार्यक्रम होऊन, **प्रमाणपत्राचे वाटप** झाले. यानंतर कार्यशाळेचा समारोप झाला.

या कार्यशाळेची तांत्रिक बाजू प्रा. दिगंबर कुलकर्णी आणि प्रा. निलेश कांबळे यांनी सांभाळली. तर प्रशासकीय बाजू श्री. संदिप इथापे यांनी सांभाळली. एकंदर व्यवस्थापकीय सहकार्य श्री. सचिन कांबळे, श्री. अमर गुरव, श्री. सुकुमार पुजारी या शिपाई वर्गाने आणि श्री. दत्तात्रय कोळी, श्री. महेश चौगुले, कु. अंकिता बिरंजे या स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी दिले. भोजनव्यवस्थेचे सहकार्य श्री. आवळे (कोरोची) यांनी केले.

**उद्देशांची परीपूर्ती:** १. लिंग आणि लिंगभाव या दोन संकल्पनेतील फरक उपस्थितांना लक्षात आला; २. वेगवेगळ्या माध्यमातून लिंगभाव हा सामाजिकदृष्ट्या कसा निर्माण होतो हे लक्षात आले; ३. नकळतपणे, आपणही कसे लिंगभावाचे बळी आहोत हे उपस्थितांना लक्षात आले; ४. स्त्री अथवा पुरुष म्हणून नव्हे तर एक व्यक्ती म्हणून, एकमेकांना समजाऊन घेतले पाहीजे हे उपस्थितांना समजले.

**डॉ. निरंजन कुलकर्णी,** समन्वयक, अग्रणी महाविद्यालय

## छायाचित्रे

उद्घाटन समारंभ: १) उद्घाटन, २) डॉ.निरंजन कुलकर्णी यांचे प्रास्ताविक, ३) मा.तज्ज्ञ मार्गदर्शकांचा सत्कार, ४) मा. उज्वला परांजपे यांचे मार्गदर्शन






प्रात्यक्षिक: १)एकदुसऱ्याचा परिचय; २) चौकटीबाहेरचा विचार; ३) प्रश्नावली; ४) विद्यार्थ्यांसह चर्चा






समारोप समारंभ: १) व २) सहभागी प्रतिनिधींचे मनोगत; ३) मा. डॉ. जुगळे यांचे अध्यक्षीय भाषण



